## रे. दि. मु. क्र.२०२/२०२३ मधील नि.२६ वरील आदेश

१. प्रस्तुत अर्ज मयत वादी क्र. ४ शोभा प्रल्हाद फडतरे यांचे वारस अभिलेखावर घेणेस झालेला विलंब माफ होवून मिळणेसाठी दाखल करण्यात आलेला आहे. प्रस्तुत अर्जाचे पुष्ठयर्थ वादी क्र. १ याने स्वतःचे शपथपत्र नि.क्र.२७ अभिलेखात दाखल केला आहे.

२. वादी असे कथन करतात की, वादींनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादी याचे विरुध्द प्रतिवादींनी स्वतः अगर आपले मार्फत अन्य कोणातर्फे दावा मिळकतीत खोदकाम व बांधकाम करु नये तसेच, वादींचे दावा मिळकतीमधील कब्जे वहिवाटीस हरकत, अडथळा करु नये म्हणून निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुत दाव्यातील वादी क्र. ४ श्रीमती शोभा प्रल्हाद फडतरे या दिनांक १७.०८.२०२४ रोजी मयत झालेले असून त्यांना एक मुलगा व एक मुलगी असे एकूण दोन कायदेशीर वारस असून ते प्रस्तुत दाव्याचे कामी वादी क्र. २ व ३ म्हणून सामील आहेत. सदरचे वारस अभिलेखावर दाखल करणेस ५ महिने ५ दिवसांचा विलंब झालेला आहे. सदरचा विलंब वादी यांनी जाणून बुजून अगर मुद्दामहून केलेला नाही. सदरचे वारस दाखल करणेचे नजरचुकीने राहून गेलेने, वादी यांना सदरचा विलंब झालेला आहे. त्यामुळे सदरचा विलंब माफ होवून सोबतचे दरुस्ती अर्जास अनुसरुन वारस अभिलेखावर दाखल करणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे. सदरचा विलंब माफ न झालेस, वादी यांचे न्यायहक्कावर गदा येवून कशानेही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. तसेच, प्रस्तुत दाव्याचे कामी न्यायनिवाडा करणेस तांत्रिक अडचण निर्माण होणार आहे. त्यामुळे न्यायाचे दृष्टीने वादी क्र. ४ यांचे वारस दाखल करणेस झालेला विलंब माफ होवून मिळणे गरजेचे व आवश्यक आहे. करीता, वादी क्र. ४ यांचे वारस दाखल करणेस झालेला ५ महिने ५ दिवसांचा विलंब माफ होवून मिळावा, अशी वादी यांनी विनंती केली आहे.

०३. प्रतिवादी याने प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करुन अर्जास सक्त हरकत नोंदविली आहे. त्याचे म्हणण्यानुसार, नि.क्र.२६ चे अर्जामधील मजकुर खोटा आहे. प्रतिवादी व वादी हे एकाच गावातील रहिवाशी असून एकमेकांचे शेजारी आहेत. वादींनी अर्जामध्ये वारस अभिलेखावर घेणेस झालेल्या विलंबाबाबत कोणतेही संयुक्तिक कारण दिलेले नाही. त्या अनुषंगाने कोणताही पुरावा दिलेला नाही. करीता, वादीचा अर्ज नामंजूर करणेत यावा. यदा कदाचित न्यायाचे व्यापक हेतूने वादीचा अर्ज मंजूर करणेचा झाल्यास वादीकडून र. रु. २,०००/- खर्च प्रतिवादीस देणेचा आदेश व्हावा, अशी प्रतिवादींनी विनंती केली आहे.

०४. वादी व प्रतिवादी यांच्या विधिज्ञांचा यूक्तीवाद ऐकला.

०५. प्रस्तुत अर्जाचे व अभिलेखावर दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. वादी यांनी नि.२४/१ लगत मयत वादी क्र. ४ शोभा प्रल्हाद फडतरे यांच्या मृत्यू प्रमाणपत्राची प्रत

अभिलेखात दाखल केली आहे. त्याचे अवलोकन केले असता वादी क्र. ४ शोभा प्रल्हाद फडतरे या दिनांक १७.०८.२०२४ रोजी मयत झाल्याचे दिसून येत आहे. माझ्या मते, प्रस्तुत दाव्याचा निकाल अंतिमतः गुणवत्तेवर होणेसाठी मयत वादी क्र. ४ चे वारस अभिलेखावर घेणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे.  तसेच वादी क्र. ४ हे प्रस्तुत अर्ज प्रलंबित असताना मयत झालेले आहेत. वादी यांनी दाखल केलेल्या अर्जाचा विचार करता मयत वादी क्र. ४ चे वारस अभिलेखावर घेणेस झालेला विलंब माफ करणे योग्य, संयुक्तिक व न्यायीक ठरणार आहे. करिता मी खालीलप्रमाणे आदेश पारित करतो.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांना वादी क्र. ४ चे वारस अभिलेखावर घेणेस झालेला विलंब माफ करण्यात येतो.

दि.१५.०९.२०२५.

(सलीम पी. सैय्यद )

२रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, वडूज.

<u>नियमित दिवाणी मुकदमा क्र. २०२/२०२३ मधील नि.क्र.२८ वरील आदेश</u>

०१. वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज मयत वादी क्र.४ चे वारस अभिलेखावर घेणेस परवानगी मिळणेसाठी दाखल केलेला आहे. वादी क्र.१ याने अर्ज कथनांच्या पुष्टयर्थ नि.क्र.२९ वर शपथपत्र दाखल केले आहे.

०२. वादी यांनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादी विरुध्द स्वतः अगर आपलेमार्फत अन्य कोणातर्फे दावा मिळकतीत खोदकाम व बांधकाम करु नये तसेच वादींचे दावा मिळकतीमधील कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करु नये म्हणून निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुत दाव्यातील वादी क्र. ४ शोभा प्रल्हाद फडतरे या दिनांक १७.०८.२०२४ रोजी मयत झालेले असून त्यांना एक मुलगा व एक मुलगी असे एकूण दोन अपत्ये आहेत. वादी क्र. ४ शोभा प्रल्हाद फडतरे (मयत वारस) वादी क्र. २ व ३ असे लिहीणेत यावे. प्रतिवादी क्र. ४ चे वारस प्रस्तुत दाव्यात समाविष्ठ असल्याने वादी क्र. ४ यांचे विरुध्द दावा अबेट होत नाही. करीता, वादी क्र. ४ यांचे नावापुढे 'मयत वारस वादी नं. २ व ३' असे नमूद करणेस परवानगी मिळावी, अशी वादी यांनी विनंती केली आहे.

०३. प्रस्तुत अर्जावर प्रतिवादी याने त्याचे म्हणणे दाखल करुन आक्षेप नोंदवला आहे. तो असे कथन करतो की, वादी यांनी नि.क्र.२८ वर दिलेल्या अर्जातील संपूर्ण मजकुर खोटा व लबाडीचा आहे. वादी व प्रतिवादी हे एकाच गावचे रहिवाशी असून शेजारी आहेत. वादीने नि.क्र.२८ चे अर्जास कोणतेही संयुक्तिक कारण दिलेले नाही. करीता, वादींचा अर्ज नामंजूर करणेत यावा. न्यायाचे व्यापक हेतूने अर्ज मंजूर करणेचे झाल्यास प्रतिवादीस वादी कडून खर्च देणेचा आदेश करणेत यावा, अशी प्रतिवादीने विनंती केली आहे.

०४. वादी व प्रतिवादी यांचे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०५. प्रस्तुत अर्जाचे व अभिलेखावर दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. वादी क्र. ४ च्या वारसांनी नि.क्र.२४/१ नुसार मयत प्रतिवादी क्र. ४ हिचे मृत्यूपत्र अभिलेखात सादर केली आहे. त्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादी क्र. ४ शोभा प्रल्हाद फडतरे या दिनांक १७.०८.२०२४ रोजी मयत झालेल्या आहेत. वादीने अर्ज नि.क्र.२६ प्रमाणे त्यांना मयत वादी क्र. ४ यांचे वारसांना प्रस्तुत प्रकरणात वादीपणात सामील करणेस झालेला विलंब माफ होवून मिळावा म्हणून अर्ज दाखल केला होता. सदर अर्ज गुणवत्तेवर निकाली काढणेत आला आहे व वादीस मयत वादी क्र. ४ चे वारसांना वादीपणात

सामील करणेस झालेला विलंब माफ करणेत आलेला आहे.  माझ्या मते, प्रस्तुत प्रकरण गुणवत्तेवर निकाली काढणेसाठी मयत वादी क्र.४ चे वारसांना अभिलेखात वादीपणात सामील करणे आवश्यक आहे. नक्कीच मयत वादी क्र.४ चे वारसांना प्रस्तुत दाव्यात वादीपणात सामील न केल्यास, प्रकरण अंतिमतः निकाली काढणे शक्य ठरणार नाही. करिता, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करतो.

**आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांनी मयत वादी क्र.४ चे वारसांना प्रस्तुत प्रकरणात १४ दिवसांच्या आत वादीपणात सामील करून घ्यावे.

३. मयत वादी क्र.४ चे वारसांना दाव्याचे समन्स काढण्यात येवून दाव्याची प्रत त्यासोबत जोडण्यात यावी.

दि.१५.०९.२०२५.

(सलीम पी. सैय्यद )

२रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, वडूज.